MHKO100010352012

**नियमीत दिवाणी दावा क्र. १९०/२०१२**

दत्तू बाबू जेधे मयत वारस वगैरे.
विरुध्द
रामू यल्लाप्पा कांबळे मयत वारस वगैरे.

**निशाणी क्र.५९ वर आदेश**

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला "उलटतपास नाही" हा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.४९ येथे दाखल केलेले आहे. शपथपत्र दाखल केलेनंतर कोवीड-१९ या जागतीक महारारीचा संसर्ग उद्भवलेने संपुर्ण कामकाज बंद झालेले होते. त्यामुळे प्रतिवादींना आपले वकीलांकडे येऊन माहिति देता आली नाही. तसेच, दरम्यानचे काळात लॉकडाऊन असलेने प्रतिवादी यांना प्रत्यक्ष संपर्क साधून आपल्या वकीलांना काम चालविणेबाबत माहिति देता आली नाव्हती. त्यामुळे, त्यांचेविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी यांनी काम चालविणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी क्र.१ब अशोक कांबळे हे मधुमेहाच्या व रक्तदाबाच्या आजाराने सतत आजारी असतात. त्यांना मुंबईवरुन तारखेस हजर राहणेस वेळोवेळी अडचणीचे होत आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१अ यमुनाबाई कांबळे हया सुध्दा ८५ वयाच्या वयोवृध्द महिला असुन त्यांना चालता येत नाही. त्यामुळे, संबंधीत कामाची माहिति वकीलांना भेटून वेळेत देता आली नाही. सदरचा वाद हा स्थावर मिळकतीबाबत असलेने सदरचे काम गुणदोषावर चालून निर्णीत होणेकरीता वादी यांचा उलटतपास घेणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाही चा आदेश रद्द झालेस वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. याऊलट, उलटतपास घेणेस प्रतिवादी यांना संधी न मिळालेस प्रतिवादी यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाही चा आदेश रद्द करुन वादीचा उलटतपास घेणेस परवानगी मिळावी म्हणून विनंती केली.

०३. वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दिले व असे कथन केले की, प्रस्तुत अर्जातील मजकुर खोटा व चुकीची आहे. वादींनी सदरचे शपथपत्र कोरोनापूर्वी दाखल केलेले आहे. तसेच, कोरोनाचा काळ संपल्यानंतर मे. न्यायालयाने नेमलेल्या तारखेस

प्रतिवादी यांनी घेतलेला नाही, त्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी उलटतपास घेणेस जाणुनबुजून टाळाटाळ करीत आहेत. तसेच, प्रतिवादी यांनी नि.५२ व ५३ वरील खर्चाची रक्कम देखील दिलेली नाही. सबब, वादींनी अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतीचे खरेदीखत पुर्ण होऊन मिळणेकरीता व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी वादी यांनी साक्षीदार क्र.१ विष्णू दत्तू जेधे यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.४९ अन्वये दिनांक २०/०७/२०१९ रोजी दाखल केले आहे. त्यांनतर सदर प्रकरण निशाणी क्र.४९ चे उलटतपासावर ठेवण्यात आले. प्रतिवादी यांना ब-याच संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतला नाही. त्यानंतर प्रतिवादी यांना संधी देऊन देखील उलटतपास न घेतल्याने दिनांक ३०/०६/२०२२ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे वादीचे पुराव्याकरीता ब-याच काळापासून प्रलंबीत आहे. परंतु, प्रतिवादी यांना बचावाची संधी देणेदेखील संयुक्तीक वाटते. प्रतिवादी यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे वादी यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य वाटत आहे. सदर खर्चामध्ये मागील प्रतिवादी यांना झालेला खर्च समाविष्ट करुन प्रस्तुत अर्ज रक्कम रु.१,५००/- च्या खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. त्यामुळे, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.१,५००/- (रुपये एक हजार पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

**( एस.ए.राठोड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २१/११/२०२२.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 21/11/2022 |
| Order signed by P.O. on | 21/11/2022 |
| Order uploaded on | 22/11/2022 |